**जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमांतर्गत टंचाईमुक्त करण्यासाठी निवडण्यात आलेल्या गावांमध्ये Tanishka Womens Dignity Forum या संघटनेमधील महिलांचा सहभाग करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन,

## जलसंधारण विभाग

## शासन परिपत्रक क्रमांकः जशिअ २०१५/प्र.क्र.१८१/जल ७,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १० जून, २०१५.

राज्य टंचाईमुक्त करण्याच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून राज्यामध्ये "जलयुक्त शिवार अभियान" हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येत असून जलसंधारण विभाग नोडल विभाग म्हणून काम करीत आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यात दरवर्षी ५००० गावे टंचाईमुक्त करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतलेला असून, पहिल्या वर्षी मार्च २०१६ पर्यंत टंचाईमुक्त करण्यासाठी ५००० गावांची निवड करण्यात आलेली आहे, त्यानुसार सदर ५००० गावांमध्ये या अभियानाच्या कामकाजाची सुरुवात झालेली आहे.

या अभियानामध्ये Corporate Social Responsibility (CSR), अशासकीय संस्था यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्यासाठी Delivering Change Foundation ह्या संस्थेच्या सहाय्याने राज्यातील प्रमुख उद्योजकांच्या प्रतिनिधींची एक बैठक मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.२७ मार्च २०१५ रोजी पार पडली. या बैठकीमध्ये Delivering Change Foundation यांनी Tanishka Womens Dignity Forum या संघटनेमधील महिलांचा सहभाग जलयुक्त शिवार अभियानाच्या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे प्रतिपादन केले होते. त्या अनुषंगाने Delivering Change Foundation संस्थेकडून याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने असे निदेश देण्यात येत आहेत की, तनिष्क महिला सदस्या (Co-ordinator) यांचेकडून जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमाबाबत गावागावात जाऊन अभियानाबाबत जनजागृती तसेच गावातील महिलांमध्ये/महिलांच्या गटांमध्ये अभियानाच्या कामाबाबत जागृती करण्यासाठी त्यांच्या बैठका घेणे, ग्राम पंचायतीशी अभियानातील कामकाजाच्या अनुषंगाने समन्वय साधणे, अभियानांतर्गत होत असलेल्या कामांसंदर्भात त्यांच्या काही सूचना किंवा तक्रारी असल्यास त्याबाबत त्यांनी संबंधित उप विभागीय अधिकारी यांचेशी संपर्क साधून त्यांच्याकडे सूचना/तक्रारी दाखल करणे व त्यावरील कार्यवाहीसाठी पाठपुरावा करणे अशा सहभागाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

प्रत्यक्ष गावात नियुक्त करण्यात येणाऱ्या तनिष्क महिला समन्वयकासोबत प्रादेशिक समन्वयक (Regional Co-ordinators) संपर्क साधणार असून याकरिता तनिष्क प्रादेशिक समन्वयकाची यादी खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे :-.

| Region | Tanishka Regional Coordinators | Mobile | Email Address |
|---|---|---|---|
| Ahmednagar | Suhas Deshpande | 9850784184 | suhas.deshpande@esakal.com |
| Aurangabad | Abhay Nikalje | 9881131090 | abhay.nikalje@esakal.com |
| Kolhapur Region (Kilhapur,Sangli, Ratnagiri, Sindhudurg) | Omkar Kothawale | 9881129250 | omkar.kothawale@esakal.com |
| Jalgaon Region (Jalgaon, Dhule, Nandurbar) | Prashant Kotkar | 9881136037 | prashant.kotkar@esakal.com |
| Thane, Raigad | Ms.Seema Raut | 8888879418 | seema.raut@esakal.com |
| Nagpur, Vidarbha Region | Anand Ambekar | 9527002188 | anand.ambekar@esakal.com |
| Nashik District | Vijaykumar Ingle | 9881099291 | vijaykumar.ingle@esakal.com |
| Pune District | Dhruvakumar Kulkarni | 7350000671 | dhruvakumar.kulkarni@esakal.com |
| Satara District | Sanjay Shinde | 9881133076 | sanjay.shinde@esakal.com |
| Solapur District | Rajanish Joshi | 9850064066 | rajanish.joshi@esakal.com |

Tanishka Womens Dignity Forum च्या महिला Co-ordinator यांच्या वर नमूद करण्यात आलेल्या सहभागाच्या धर्तीवर स्थानिक पातळीवरील अन्य इतर अशासकीय संस्थांकडून त्यांच्या प्रस्तुत अभियानामधील सहभागाबाबत मागणी प्राप्त झाल्यास, संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीने याबाबत त्यांच्या स्तरावर उचित निर्णय घेण्याची कार्यवाही करावी.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६१०१७२४२४४९२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: CN = Vinod S Wakhare, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2015.06.15 11:33:35 +05'30'

( वि. सि. वखारे )
उप सचिव

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य,
६. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
७. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक,
८. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक,
१०. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. विभागीय आयुक्त (सर्व),
१३. संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे - ४११ ००१,
१४. मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) व विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम पुणे व नागपूर,
१५. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६. संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
१७. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे,
१९. अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे,

२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता),
२१. सर्व जिल्हाधिकारी,
२२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२३. महालेखापाल १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता),
२४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२५. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२६. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय,
२७. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२८. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२९. सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण),
३०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३१. सर्व मंत्रालयीन विभाग,
३२. सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई,
३३. नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
३४. कार्यासन, जल-११, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
३५. निवडनस्ती (जल-७)

Woman from Tanishka Womans Dignity Forum to be appointed in the villages selected under Jalyukt Shivar Abhiyan.